सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता गौण खनिजावरील स्वामित्वधन वसुलीच्या उद्दिष्टाबाबत

जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
पहिला मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम काम मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

शासन निर्णय क्र.गौखनि-१०/०४२६/ प्र.क्र.११३/ख-२/ई-१६३३३४२
दिनांक : १९ मे, २०२६.

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाच्या खाण व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ मधील नियम १५ अनुसार गौण खनिजासंबंधी नियम करण्याचे व स्वामित्वधन निश्चित करण्याचे अधिकार राज्य शासनास प्रदान केले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने गौण खनिजाच्या विनियमनासंबंधी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ तयार केलेले आहेत. त्याअनुषंगाने गौण खनिजावरील स्वामित्वधन वसुलीचे सन २०२६-२०२७ चे उद्दिष्ट निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०२६-२०२७ करिता गौण खनिजावरील स्वामित्वधन वसुलीचे उद्दिष्ट राज्यस्तरावरून निश्चित करण्यात आले आहे. या वर्षामध्ये सदर उद्दिष्टाचे जिल्हानिहाय वाटप सोबतच्या "विवरणपत्र-अ"नुसार करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांनी सदर उद्दिष्ट महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायत व ग्रामिण क्षेत्राकरिता ठरवून दयावे व त्याची प्रत शासनास पाठविण्यात यावी.

०२. वित्त विभागाने सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता प्रधान लेखाशिर्ष ०८५३ अलोहयुक्त खाणकाम व धातूशास्त्रीय उद्योग या अंतर्गत वेगवेगळ्या सी.आर.सी. गौख खनिजासाठी स्वामित्वधन वसुलीचे उदिष्ट निश्चित केलेली आहेत. त्यानुषंगाने गौण खनिजाकरिता अर्थसंकल्पीय सन २०२६-२०२७ या वर्षाकरीता गौण खनिजाच्या महसूल उदिष्टाची वसूली करीता जिल्हानिहाय व विभागनिहाय विगतवारी "विवरणपत्र-अ" प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार गौण खनिजावरील स्वामित्वधन, पर्यावरण शुल्क व उपकरापोटी वसुलीची तसेच सेवा व सेवा फी आणि इतर जमा रकमा वसुलीची रक्कम महानगरपालिका क्षेत्र, नगरपरिषदा/ नगरपंचायत क्षेत्र तसेच ग्रामीण क्षेत्रानुसार रक्कम दिलेल्या लेखाशिर्षनिहाय जमा करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करण्यात यावी. तसेच सदर रक्कमा दिलेल्या लेखाशिर्षनिहाय जमा होत आहे किंवा नाही त्याबाबतचे सनियंत्रण संबंधित विभागीय आयुक्त यांनी करणे बंधनकारक राहील.

०३. सदर उद्दिष्टपूर्ती दिनांक ३१ मार्च, २०२७ पूर्वी करण्यात यावी. उद्दिष्ट वसुलीवर सनियंत्रण राहण्याच्या दृष्टीने वसुलीबाबतचा मागील महिन्याचा मासिक अहवाल पुढील महिन्याच्या दहा तारखेपर्यंत विहित केलेल्या नमुन्यात संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांना पाठवून त्याची एक प्रत शासनास अग्रेषित करावी. ज्या जिल्ह्यांकडून विहित विवरणपत्रात माहिती प्राप्त होणार नाही त्या जिल्ह्यांतील जिल्हा खनिकर्म अधिकारी व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल.

०४. महसूल अधिकाऱ्यांनी जमेच्या रकमा कोषागारात जमा करतांना चलनामध्ये संगणक संकेतांकासह व त्याबाबतच्या योग्य त्या संपूर्ण तपशीलासह लेखाशिर्ष नमूद करावे. नवीन जमेच्या लेखाशिर्षाप्रमाणे जमा रकमांची वसूली करण्याची जबाबदारी संबंधित नियंत्रक अधिकारी यांची राहील.

०५. गौण खनिजावरील स्वामित्वधनाप्रासून प्राप्त जमेच्या नोंदी कोषागारातील आणि लेखापरिक्षा कार्यालयातील नोंदीशी मेळ जमवण्याच्या असाव्यात. तसेच जमा रकमांचा वेळोवेळी ताळमेळ घालण्यात यावा.

०६. विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील जिल्ह्यांना दिलेल्या उद्दीष्टांच्या अनुषंगाने मासिक विवरणपत्र विचारात घेऊन, सर्व संबंधितांना यथोचित सूचना वेळोवेळी द्याव्यात व उद्दीष्टपूर्तीत विभागातील कोणताही जिल्हा मागे राहणार नाही याची काळजी घ्यावी. प्रत्येक महसूली विभागाने कोणत्याही परिस्थितीत गौण खनिजाचे उद्दीष्ट पूर्ण करणे आवश्यक राहील. यासाठी जरूर तर आपल्या महसूली विभागाचे एकूण उद्दिष्ट कायम ठेवून, संबंधित विभागीय आयुक्त यांना विभागांतर्गत जिल्हयाच्या उद्दिष्टामध्ये आवश्यकतेनुसार फेर बदल करता येईल.

०७. गौण खनिजाच्या अवैध उत्खननाची व अनधिकृत वाहतूकीची प्रवृत्ती वाढत असल्याचे दिसून येते, त्यामुळे मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी. तसेच गौण खनिजाच्या उत्खनन स्थळांची वेळोवेळी पाहणी करून केलेल्या उत्खननाची ETS मशीनद्वारे मोजणी करण्यात यावी. गौण खनिजाच्या विनापरवाना वाहतुकीस आळा बसेल, यादृष्टीने आवश्यक त्या कडक उपाययोजना करण्यात याव्यात. तहसिलदार व उप विभागीय अधिकारी यांनी अवैध उत्खनन व अनधिकृत वाहतुकीस प्रतिबंध करण्याकरिता उप विभाग स्तरावर व तालुकास्तरावर दक्षता पथके स्थापन करावी. अशा पथकांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील नोंदविण्यासाठी उपविभाग/तहसील स्तरावर नोंदवही ठेवावी, तसेच सर्व उप विभागीय अधिकाऱ्यांनी दरमहा दक्षता पथकांनी केलेल्या कामाचा आढावा घ्यावा.

०८. ज्या जिल्हयात अवैध उत्खनन मोठ्या प्रमाणावर चालू आहे त्या जिल्हयात जिल्हाधिकाऱ्यांनी अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी विशेष उपाययोजना आखून त्याविषयी विभागीय आयुक्त व शासनास अवगत करण्याची दक्षता घ्यावी.

०९. प्रत्येक विभागीय आयुक्त यांनी प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत महसुली जमेच्या आकडेवारीसह माहिती शासनास सादर करावी.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५१९१८३५२४६४१९ हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9BD008875B6A3A9FDDAD3E55FE0328DF13A27221CB2BBC67ABD0155F914EFC01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2026.05.19 18:37:18 +05'30'

**(सदानंद गो मोहिते)**
**कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग**

**सोबत- विवरणपत्र**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
६. मा. विधानपरिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
७. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा. मंत्री/मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
९. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य

१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, जुने सचिवालय इमारत, नागपूर
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर
१४. कक्ष अधिकारी,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. कक्ष अधिकारी, टी/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१६. निवडनस्ती.

# विवरणपत्र-अ

| | | |
|---|---|---|
| शासन निर्णय क्र.गौखनि १०/०४२६/ प्र.क्र.११३/ख-२/ई-१६३३३४२, दि.१९ मे, २०२६ चे सहपत्र | | |
| सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी गौण खनिजावरील स्वामित्वधन वसूलीचे उद्दिष्ट | | |
| विभाग | जिल्हा | सन २०२६-२०२७ चे प्रस्तावित उद्दीष्ट (रू.लक्ष) |
| कोकण | मुंबई (शहर) | ७००० |
| | मुंबई (उपनगर) | २५००० |
| | ठाणे | ३०००० |
| | पालघर | ३०००० |
| | रायगड | ३०००० |
| | रत्नागिरी | ८००० |
| | सिंधुदूर्ग | ७५०० |
| **एकुण** | | **१३७५००.००** |
| नाशिक | नाशिक | २०००० |
| | धुळे | ६००० |
| | नंदूरबार | ४००० |
| | जळगांव | १४५०० |
| | अहिल्यानगर | १८००० |
| **एकुण** | | **६२५००.००** |
| पुणे | पुणे | ३५००० |
| | सातारा | १०००० |
| | सांगली | ९००० |
| | सोलापूर | १५००० |
| | कोल्हापूर | ९००० |
| **एकुण** | | **७८०००.००** |
| छत्रपती संभजीनगर | छत्रपती संभजीनगर | १२००० |
| | जालना | ७००० |
| | परभणी | १४५०० |
| | हिंगोली | च्६००० |
| | बीड | ११००० |
| | नांदेड | १८००० |
| | धाराशीव | ६००० |
| | लातूर | ६००० |
| **एकुण** | | **८०५००.००** |
| अमरावती | अमरावती | १०००० |
| | बुलढाणा | ११००० |
| | अकोला | ११००० |
| | वाशिम | ४२०० |
| | यवतमाळ | १७००० |
| **एकुण** | | **५३२००.००** |
| नागपूर | नागपूर | २३००० |
| | वर्धा | ६००० |
| | भंडारा | २०००० |
| | गोंदीया | ८००० |
| | चंद्रपूर | १८००० |
| | गडचिरोली | ११००० |
| **एकुण** | | **८६०००.००** |
| **एकुण** | | **४९७७००.००** |

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9BD008875B6A3A9FDDAD3E55FE0328DF13A27221CB2BBC67ABD0155F914EFC01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2026.05.19 18:37:34 +05'30'

**(सदानंद गो. मोहिते)**

**कार्यासन अधिकारी,महसूल व वन विभाग**